महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांकः एएससी १५१७/प्र.क्र.११/१४ अ.
खोली क्र.५५७/५५९ (विस्तार), ५ वा मजला, मंत्रालय
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मुंबई ४०००३२
दिनांक : १५ मार्च, २०१८

वाचा :- (१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : एसआरव्ही २०१६/प्र.क्र.२९०/का.१२, दिनांक १९.११.२०१६

(२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : एसआरव्ही २०११/प्र.क्र.१३७/का.१२, दिनांक १७.१२.२०१६

प्रस्तावना :-

गट-ब (अराजपत्रित) आणि गट-क मधील पदांवर सरळसेवेने, पदोन्नतीने वा प्रतिनियुक्तीने करावयाच्या नेमणुका/पदस्थापनेच्या प्रकरणांवर अंतिम निर्णय घेण्यासाठी नियुक्ती प्राधिकारी घोषित करण्याबाबतच्या सूचना संदर्भाधिन शासन निर्णयांन्वये देण्यात आल्या आहेत. त्यानुसार मंत्रालयीन विभागातील गट-ब (अराजपत्रित) संवर्गातील उच्चश्रेणी लघुलेखक, निम्नश्रेणी लघुलेखक, सहायक कक्ष अधिकारी आणि गट-क संवर्गातील लघुटंकलेखक व लिपिक-टंकलेखक संवर्गातील पदांवर सरळसेवेने, पदोन्नतीने वा प्रतिनियुक्तीने करावयाच्या नेमणुका/पदस्थापनेच्या प्रकरणांवर अंतिम निर्णय घेण्यासाठी नियुक्ती प्राधिकारी घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

मंत्रालयीन विभागातील गट-ब (अराजपत्रित) संवर्गातील उच्चश्रेणी लघुलेखक, निम्नश्रेणी लघुलेखक, सहायक कक्ष अधिकारी आणि गट-क संवर्गातील लघुटंकलेखक व लिपिक-टंकलेखक संवर्गातील पदांवर सरळसेवेने, पदोन्नतीने वा प्रतिनियुक्तीने करावयाच्या नेमणुका/पदस्थापनेच्या प्रकरणांवर अंतिम निर्णय घेण्यासाठी नियुक्ती प्राधिकारी हे सामान्य प्रशासन विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव व सचिव (सेवा) राहतील. तथापि, सदरहू संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या अन्य आस्थापनाविषयक बाबी **उदा.** विभागातील नियुक्ती, विभागीय चौकशी, सेवानिवृत्तीविषयक प्रकरणे इ. बाबींसंदर्भात अंतिम निर्णय घेण्याकरीता नियुक्ती प्राधिकारी हे संबंधित कर्मचारी ज्या विभागाच्या आस्थापनेवर कार्यरत आहेत त्या विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव व सचिव राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३१५१६०३५४१५०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Gajanan Bhimrao Gurav

Digitally signed by Gajanan Bhimrao Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8a5b973b0795ae988a7c005050f9180a8021798a5c1ed41ada8a72725a47b4f0, serialNumber=54b11b1ccbdc577d71dce3b313c3fef5dc2ad659e360f73b682d6b6fccb8aecf, cn=Gajanan Bhimrao Gurav
Date: 2018.03.15 16:04:29 +05'30'

(ग.भि.गुरव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

(१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
(२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
(३) सर्व मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
(४) मा.विरोधी पक्ष नेता, विधान परिषद/विधानसभा, विधानभवन, मुंबई,
(५) सर्व मा.संसद सदस्य/विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,
(६) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य,
(७) सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
(८) उप सचिव (का.१२), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
(९) सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने
(१०) निवड नस्ती.